| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल दिनांक | : | २०.०२.१९९७ | | |
| नोंदणी दिनांक | : | २०.०२.१९९७. | | |
| निकाल दिनांक | : | १६.०३.२०२६ | | |
| कालावधी | : | वर्ष | महिने | दिवस |
| | | २९ | ०० | २७ |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.१, कुरुंदवाड, जि. कोल्हापूर यांचे न्यायालयात.**

**(पिठासीन अधिकारी – श्री. बाळासाहेब श्री. गायकवाड)**

**प्रपत्र क्र.३२ भाग 'अ'**

[ फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ **(i)** ]

| | | |
|---|---|---|
| **MHKO180000551997** | (जाहीर दिनांक – १६.०३.२०२६)<br>**नियमित फौजदारी खटला क्र.२२/१९९७.**<br>CNR No. MHKO18-000055-1997.<br>**निशाणी क्र.१७.** | |
| **गुन्ह्याचा तपशिल** | पोलीस ठाणे, कुरुंदवाड गुन्हा क्र.४४/१९८८,<br>भारतीय दंड संहिताचे कलम ४२०. | |
| **अभियोगपक्ष** | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, कुरुंदवाड | |
| **अभियोगपक्षातर्फे** | **श्री. सं.सि.नदाफ, विद्यमान सहा. सरकारी अभियोक्ता.** | |
| **आरोपी** | १. | **पांडुरंग केशव बोगा,**<br>वय ४१ वर्षे, रा. शिरसिल्ला जि. करीम नगर, आंध्र प्रदेश. |
| | २. | **विठ्ठल गणपती यादगीर (सी.सी.क्र.५२/१९८८ या प्रकरणात प्रस्तुत आरोपीस दिनांक ०३.१२.१९८८ रोजी शिक्षा ठोठाविण्यात आली आहे.)** |
| **आरोपी क्र.१ तर्फे** | **श्री. गि.शं.कुलकर्णी, विद्यमान वकील.** | |

**भाग 'ब'**

**[ फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii) ]**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | ११.०४.१९८८ |
| प्रथम खबरी अहवाल तारीख | ११.०४.१९८८ |

| | |
|---|---|
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २०.०२.१९९७ |
| दोषारोप निश्चित तारीख | १२.०३.१९९७ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २६.०२.२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | -- |
| न्यायनिर्णयाची तारीख | १६.०३.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | -- |

| **आरोपी क्र.१ याचा तपशिल** | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आरोपी क्र. | आरोपी क्र.१ याची नावे | अटक तारीख | जामीन तारीख | दोषारोप ठेवलेले अपराध | निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली | शिक्षेचे स्वरुप | फौ.प्र.सं.कलम ४२८ करीता संपरिक्षे दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी |
| १. | पांडुरंग केशव बोगा | २३.०१.१९९७ | २५.०३.१९९७ | भारतीय दंड संहिताचे कलम ४२०. | निर्दोष | – | – |

**प्रपत्र क्र.३२ भाग 'क'**

**[ फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(iii) ]**

**सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ. सरकारी**

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|---|
| १. | महंमद बाबू मतवाल | पंच | १६ |

**ब. बचावाचे साक्षीदार**

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|---|
| नाही | | | |

**क. न्यायालयीन साक्षीदार**

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|---|
| नाही | | | |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

### अ. सरकारी

| क्रमांक | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| | | नाही. |

### ब. बचाव

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही | | |

### क. न्यायालयीन निशाण्या

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही | | |

### मुद्देमाल

| क्रमांक | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | १. | धोतर जोडया एकूण नग ११७ |

## :: न्या य नि र्ण य ::

(अधिघोषित दिनांक १६.०३.२०२६)

आरोपी क्र.१ याच्याविरुध्द भारतीय दंड संहिताचे कलम ४२० सह कलम ३४ या आरोपाखाली दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन :–**

०२. दिनांक ११.०४.१९८८ रोजी दुपारी ०१.१५ वाजताच्या सुमारास मौजे खिद्रापूर येथील तक्रारदार बादशा बापूसो मुजावर यांच्या पावर मागाच्या कारखान्यात आरोपी क्र.१ व २ हे गेले होते. कारखान्यातील धोतर जोडया तक्रारदार यांनी इचलकरंजी येथे आणण्यास सांगीतल्याचे आरोपी क्र.१ यानी कारखान्यामध्ये हजर असणारे हैदरखान मोकाशी यांना खोटे सांगून कारखान्यातील १४० धोतर जोडया नेऊन सदर मालाची परस्पर विल्हेवाट

लावून तक्रारदार यांची फसवणूक केली. सदर घटनेबाबत तक्रारदार यांनी दाखल केलेल्या तक्रारीवरुन आरोपी क्र.१ याच्याविरुध्द पोलीस ठाणे, कुरुंदवाड येथे भारतीय दंड संहिताचे कलम ४२० सह कलम ३४ या आरोपाखाली गु.र.क्र.४४/१९८८ नोंदविण्यात आला. आरोपी क्र.२ याच्याविरुध्द तपासीक अंमलदार यांनी तपासाअंती दाखल केलेल्या दोषारोपपत्रावरुन नोंदविण्यात आलेल्या सी.सी.क्र.५२/१९८८ या प्रकरणामध्ये दिनांक ०३.१२.१९८८ रोजी आरोपी क्र.२ यास चार महिने सक्त मजूरी व सातशे पन्नास रुपये दंड आणि दंड न भरल्यास तीन महिने सक्त मजूरीची शिक्षा ठोठाविण्यात आली. त्यानंतर, तपासीक अंमलदार यांनी आरोपी क्र.१ याच्याविरुध्द दाखल केलेल्या दोषारोपपत्रावरुन प्रस्तुत प्रकरण नोंदविण्यात आले.

०३. दिनांक १२.०३.१९९७ रोजी माझे विद्वान पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपी क्र.१ याच्याविरुद्ध भारतीय दंड संहिताचे कलम ४२० या आरोपाखाली निशाणी क्र.०२ वर दोषारोप निश्चित केले. सदर दोषारोप आरोपी क्र.१ यास त्याच्या भाषेत वाचुन व समजावुन सांगितले असता आरोपी क्र.१ याने उक्त दोषारोप नाकारला व संपरीक्षेला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर, आरोपी क्र.१ हा वेळोवेळी गैरहजर राहिल्यामुळे त्याच्याविरुध्द गैरजमानती अधिपत्र काढण्यात आले आणि फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ८२ अन्वये उद्घोषणा करण्यात आली. परंतू, पोलीसांना आरोपी क्र.१ यास अटक करुन न्यायालयासमक्ष हजर करता आले नाही. त्यामुळे, आरोपी क्र.१ याच्याविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २९९ अन्वये पुरावा सादर करण्याबाबत माझे विद्वान पुर्व पिठासीन अधिकारी यांनी दिनांक ११.०४.२०२२ रोजी निशाणी क्र.१ वर आदेश पारित केले.

०४. अभिलेखावरील पुराव्यावरुन व दोन्ही पक्षांच्या युक्तिवादावरुन न्यायनिर्णयासाठी उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसासह मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे :–

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | घटनेवेळी आरोपी क्र.१ याने आरोपी क्र.२ याच्याशी आपसात संगनमत करुन तक्रारदार यांची ठकवणूक केली, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली आहे काय ? | ...नाही. |
| २. | आदेश काय ? | ...आरोपी क्र.१ याची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

०५. आरोपी क्र.१ याच्याविरुद्धचा गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने पंच महंमद बाबु मतवाल यांची एकमेव साक्ष निशाणी क्र.१६ नोंदविली. तक्रारदार हे त्यांच्या नमूद पत्त्यावर मिळून येत नसल्याबाबत पोलीसांनी निशाणी क्र.१३ वर अहवाल दाखल केला आहे. उर्वरित साक्षीदारांची साक्ष अभिलेखावर नोंदविण्याकरीता अभियोगपक्षास वेळोवेळी संधी देवून देखील अभियोगपक्षाने सदर साक्षीदारांना न्यायालयासमक्ष हजर केले नाही. त्यामुळे, निशाणी क्र.०१ वरील आदेशानुसार अभियोगपक्षाचा साक्षीपुरावा बंद करण्यात आला. आरोपी क्र.१ यास गुन्ह्यात गोवण्याईतपत कोणताही साक्षीपुरावा अभियोगपक्षाने अभिलेखावर आणला नसल्यामुळे आरोपी क्र.१ याचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

०६. अभियोगपक्षातर्फे विद्यमान सहाय्यक सरकारी वकील श्री. सं.सि.नदाफ यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

:: **<u>कारणमिमांसा</u>** ::

**<u>मुद्दा क्र.१ करीता</u> :–**

०७. पंच महंमद यांनी ते आरोपींना ओळखत नसल्याचे कथन केले आहे. पोलीसांनी त्यांच्यासमक्ष कोणताही पंचनामा केला नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. अटक पंचनाम्यावरील सही त्यांची नसल्याचे व त्यातील मजकुराबाबत त्यांना काहीही माहिती नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. पंच महंमद हे अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य करीत नसल्यामुळे अभियोगपक्षाने न्यायालयाच्या परवानगीने त्यांना उत्तरसुचक प्रश्न विचारले. परंतु, अभियोगपक्षास पंच महंमद यांच्या साक्षीपुराव्यातून अभियोगपक्षास उपयुक्त अशी कोणतीही बाब अभिलेखावर आणता आली नाही. अभियोगपक्षाने पंच महंमद यांच्या व्यतिरीक्त अन्य कोणत्याही साक्षीदाराची साक्ष अभिलेखावर नोंदविली नाही.

०८. वरील विवेचनावरुन असे दिसुन येते की, पंच महंमद यांनी अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य केले नसल्यामुळे आणि तक्रारदार व उर्वरित साक्षीदार यांच्या साक्षीपुराव्याअभावी अभियोगपक्षास आरोपी क्र.१ याच्याविरुध्दचा गुन्हा संशयापलीकडे सिध्द करण्याकरीता कोणताही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष तसेच सुसंगत असा सबळ पुरावा अभिलेखावर आणता आला नाही. सबब, अभियोगपक्षास आरोपी क्र.१ याच्याविरुध्द ठेवण्यात आलेल्या अपराधाची मुलतत्वे संशयापलीकडे सिध्द करता आली नाहीत. त्यामुळे, मुद्दा क्र.१ चे उत्तर मी नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करीता</u> :–**

०९. अभियोगपक्षाच्या एकुण साक्षीपुराव्यावरुन आरोपी क्र.१ याच्याविरुध्द

कोणताही गुन्हा संशयापलीकडे सिध्द होत नाही. त्यामुळे, आरोपी क्र.१ यास संशयाचा फायदा देऊन त्याची प्रस्तुत गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित होईल. सबब, मुद्दा क्र.२ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**:: आ दे श ::**

१. आरोपी क्र.१ पांडूरंग केशव बोगा याची भारतीय दंड संहिताचे कलम ४२० या गुन्ह्यातुन फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपी क्र.१ याचे जामीन कद्‌बे अपीलीय कालावधीनंतर रद्द करण्यात येतात. आरोपी क्र.१ याच्याविरुध्द निर्गमित करण्यात आलेले गैरजमानती बंधपत्र व जामीनदाराची नोटीस विनातामील परत मागविण्यात यावेत.

३. जप्त मुद्देमाल धोतर जोड्या एकूण नग ११७ या मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याकरीता पोलीस ठाणे अंमलदार, पोलीस ठाणे, कुरुंदवाड यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम प्रकरण ६ कलम ८२ ते ८८ अन्वये नियमाप्रमाणे अपिलीय कालावधीनंतर कार्यवाही करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2026.03.17 17:30:55 +0530

दिनांक : १६.०३.२०२६ (बाळासाहेब श्री. गायकवाड)
कुरुंदवाड. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, कुरुंदवाड.